## G + 1 घर विकणे आहे

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

**ठिकाण** : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

**अपेक्षित किंमत : ७८ लाख + टॅक्स**

**संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



## लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय

फक्त ५१०००/- रु.

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट

मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १४३ वा | सोमवार, दि. ०६ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सध्या राजकारण्यांचे धोरण म्हणजे 'वापरा अन फेका'!

## नितीन गडकरी यांचा 'घरचा आहेर' | पुरुषोत्तम खेडेकर यांचा अमृतमहोत्सवानिमित्त विशेष गौरव

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** 'राजकारणाबद्दल माझं मत चांगलं नाही. सध्या राजकारणात 'युज अॅण्ड थ्रो' केलं जातं,' असा 'घरचा आहेर' केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी दिला आहे. तसेच 'जो पक्ष सत्तेत आहे, त्या पक्षात प्रवेशासाठी अनेकांचा प्रयत्न असतो. मात्र, सत्ता गेली, जहाज पाण्यात बुडू लागलं की, हीच मंडळी उंदरांप्रमाणे आधी उड्या मारतात. आपल्या देशात विचारभिन्नता ही समस्या नाही, तर विचारशून्यता ही समस्या आहे,' असेही ते म्हणाले.

मराठा सेवा संघ व युगनायक पुरुषोत्तम खेडेकर अमृत महोत्सव गौरव समितीतर्फे मराठा सेवा संघाचे संस्थापक-अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित सोहळ्यात गडकरी बोलत होते. यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष विजय घोगरे, माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील, पुरुषोत्तम खेडेकर, आमदार रेखा खेडेकर, माधव पाटील-शेळगावकर, ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव, कर्नाटकमधील आमदार डॉ. मारोतराव मुळे, विक्रम बोके, व्यंकट गायकवाड, हेमंतकुमार देशमुख, विठ्ठल गायकवाड, गिरीश जोशी, आमदार शंकर जगताप, राजेंद्र पवार, रवींद्र माळवदकर, विलास लांडे आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले, 'आपली बांधिलकी कशासोबत आहे, हे प्रत्येकाला माहीत असावे. पक्षात आणि संघटनेत कार्यकर्त्यांचा माणूस म्हणून विचार केला गेला पाहिजे. मात्र, सध्या तो होताना दिसत नाही. पक्षाचा शिक्का लागला की, त्या नेत्यावर मयार्दा येतात. सध्या सत्ता येईल त्या पक्षात प्रवेशासाठी नेत्यांची धडपड सुरू असते. मात्र, सत्ता गेल्यानंतर हेच नेते तिथून दुसरीकडे उड्या मारतात. अद्यापि आपल्या समाजात जातपात, अस्पृश्यता, विषमता आहे, ही दुर्दैवाची बाब आहे. समाजाला घातक असणाऱ्या या सर्व गोष्टी संपुष्टात आल्या पाहिजेत. त्या व्यक्तीची गुणवत्ता ही त्या व्यक्तीला



श्रेष्ठ बनवत असल्याने त्याच्यावर जातीचे लेबल लावणे चुकीचे आहे. गुणवत्तेच्या आधारावरच जातपात, भाषा, राज्याच्या पलीकडे जाऊन स्वतःची ओळख निर्माण करता येते. सध्या जगाला विश्वगुरूची गरज आहे. त्यामुळे हिंदुस्थानला विश्वगुरू 'बनायचे असेल तर 'ज्ञान' प्राप्त करणे अत्यंत गरजेचे आहे. '

पुरुषोत्तम खेडेकर यांनी मराठा सेवा संघाच्या कायार्चा आढावा घेतला. यावेळी माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील, माधव पाटील-शेळगावकर, इंद्रजित भालेराव, डॉ. मारोतराव मुळे, रवींद्र माळवदकर आदींनी मनोगत व्यक्त केले. मदन पाटील लिखित 'क्रांतिपुरुष पुरुषोत्तम खेडेकर' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. गंगाधर बनबरे यांनी प्रास्ताविक केले. स्नेहा खेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### छत्रपती शिवाजी महाराज हे माझे आदर्श!

'छत्रपती शिवाजी महाराज हे माझे आदर्श आहेत. त्यांच्यासारखा दुसरा आदर्श राजा झालेला नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांनी अनेक लढाया जिंकल्या, अनेक राज्ये त्यांनी पादाक्रांत केली. मात्र, त्यांनी कधीही दुसऱ्या धर्माच्या धार्मिक स्थळांना धक्का लावला नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज खऱ्या अर्थाने सेक्युलर राजे होते. सर्वधर्मसमभाव असणारे ते एकमेव राजे होते. सर्वधर्मसमभाव म्हणजेच सेक्युलर,' असेही गडकरी यांनी नमूद केले.



क्रांतिपुरूष पुरुषोत्तम खेडेकर साहेब, सचिन जगताप-जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड, जयंत पाटील-संस्थापक सरपंच परिषद, विजयकुमार परबत-जि.प्रसिध्दीप्रमुख, शंकर पोळ-जि.उपाध्यक्ष, निनाद पाटील-तालुकाध्यक्ष मराठा सेवा संघ माळशिरस, दिगंबर मिसाळ-तालुकाध्यक्ष संभाजी ब्रिगेड माळशिरस, अमित घोगरे-तालुकाध्यक्ष करमाळा,मदन खाटमोडे-ता. कार्याध्यक्ष, सचिन पराडे-ता.उपाध्यक्ष माळशिरस, सत्यम सुर्यवंशी-शहर उपाध्यक्ष जेऊर, विजय काळे-सदस्य मसेसं, राजाभाऊ व्यवहारे-जि.का. सदस्य, प्रभाकर शिंदे, सचिन खुळे-शहराध्यक्ष संभाज ब्रिगेड टेंभुर्णी, योगेश मुळे-शहर उपाध्यक्ष, गणेश जगताप-शाखाप्रमुख सापटणे आदी.

### ... मग एका मिनिटात आरक्षण!

'केंद्र सरकारच मराठ्यांना आरक्षण देऊ शकते. आज महाराष्ट्रात ४८ खासदार आहेत. त्या सर्वांनी 'मराठा समाजाला आरक्षण द्या, नाहीतर तुमचा पाठिंबा काढून घेतो,' असे पंतप्रधानांना सांगितले तर एका मिनिटात आरक्षण मिळेल,' असे न्यायमूर्ती कोळसे- पाटील म्हणाले.

### खोटारडा पंतप्रधान बसवण्यापेक्षा गडकरी, तुम्ही का पंतप्रधान होत नाही ? - कोळसे-पाटील

'देशातील लोकांच्या डोक्यावर खोडारडा पंतप्रधान बसवण्यापेक्षा नितीन गडकरी तुम्ही पंतप्रधानपद का घेत नाही? नितीन गडकरी हे सर्वसमावेशक नेते आहेत. सर्वांना एकत्र घेऊन चालणारे आहेत. त्यामुळे पंतप्रधानपदाची संधी मिळाल्यास गडकरी हे नक्की पंतप्रधान होऊ शकतील आणि त्याला काही हरकत नसेल,' असे स्पष्ट मत माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील यांनी व्यक्त केले.

### भाडोत्री लोक गोळा करण्याचे फॅड

'सध्या सभांना गर्दी व्हावी म्हणून गाड्या किंवा एसटी भरून भाडोत्री लोकांना आणण्याचे फॅड आहे. मात्र, हे लोक येतात, जेवतात आणि नेत्याचे भाषण होण्याच्या आधीच निघून जातात. पण असे करणाऱ्या नेत्यांमधला मी नाही. माझ्या सभेला ५० लोक आले तरी चालतील; पण मी लोकांची गर्दी व्हावी म्हणून कधीही गाड्या पाठवणार नाही,' असेही गडकरी म्हणाले.


## हुरडा पार्टी

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

**आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.**

**मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११**


## उजनी धरणातून जिल्ह्याला संपूर्ण उन्हाळ्यात पाणी मिळण्याचे नियोजन करण्यात येणार - जलसंपदा मंत्री विखे पाटील



**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणात उपयुक्त पाणीसाठा 96.92% इतका उपलब्ध आहे. मागील वर्षी 66 टक्के पाणी उपलब्ध होते. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी व नागरिकांना पिण्यासाठी संपूर्ण उन्हाळा पाणी उपलब्ध राहील यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. धरणात पाणी उपलब्ध आहे म्हणून पाण्याची उधळपट्टी अजिबात करू नये. तसेच सोडलेल्या अवर्तनातून पाण्याची बचत करावी, असे आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित उजनी प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) श्री. विखे पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, राजू खरे, अभिजीत पाटील, नारायण पाटील, उत्तम जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, महापालिका आयुक्त शितल तेली उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता तथा कालवा सल्लागार समितीचे सचिव सु. सा. खांडेकर, अधीक्षक अभियंता धीरज साळी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत (पान 2 वर..)


## वाडा भाड्याने देणे आहे

**बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.**

**अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591**


## मोहोळ बसस्थानकावर बसला अचानक लागली आग

### चालक आणि वाहकामुळे मोठा अपघात टळला

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ बसस्थानकावर प्रवाशांनी भरलेली बस अचानक पेट घेतल्याने बसचे इंजिन आणि चालकाच्या आसनाजवळील भाग जळून पूर्णपणे नष्ट झाला. सुदैवाने चालक आणि वाहकांच्या त्वरित कारवाईमुळे कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

सांगोला डेपोच्या (क्रमांक MH-11 BL 9451) बसने सांगोला-हैदराबाद मार्गावर मोहोळ बसस्थानकावर सकाळी १२ वाजता थांबली. त्यावेळी बसचालक सुनिल काशीद यांना इंजिनमधून धूर येताना दिसला. त्यांनी लगेच वाहक विजय बंडगे यांना सांगितले आणि दोघांनी प्रवाशांना बसमधून गडबडीने बाहेर उतरवले.

याचदरम्यान इंजिनमध्ये आगीने पूर्णपणे पेट घेतला. तसेच या बसमध्ये एकूण ६९ (मोठे) आणि ४ (लहान) असे एकूण ७३ प्रवासी होते. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, वाहतूक



नियंत्रक, एसटी कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांनी अथक प्रयत्नांमुळे कोणतीही जिवीतहानी झाली नाही आणि बसस्थानकातील बस सेवा सुरळीत केली.

बस पेट घेतल्याचे लक्षात येताच आसपास उपस्थित असलेले सामाजिक कार्यकर्ते जिब्राईल शेख, चंदू गोडसे, सोमनाथ पवार, शैलेश स्वामी, बिलाल शेख, पिण्याचे पाणी घराघरात पुरवणारे शुभम शेटे, स्थानिक 'एसटी' कर्मचारी तानाजी गायकवाड, बबलु देसाई, वाहतूक नियंत्रक दादा उन्हाळे, पोलिस वाहतूक व्यवस्थेचे संजय नेमाजी, महादेव रोडे यांच्यासह अनेकांनी तात्काळ आग आटोक्यात आणली आणि बसस्थानकातील बस सेवा सुरळीत केली.

बसस्थानकात नोंद करण्यासाठी उतरल्यानंतर, मला इंजिनमधून धुर येत असल्याचे आणि आग लागल्याचे लक्षात आले. त्वरित वाहक विजय बंडगे याला ओरडून सांगत, आम्ही दोघांनी प्रवाशांना गडबडीने बसमधून खाली उतरायला सांगितले आणि सर्वांना सुरक्षितपणे बाहेर काढले. ही आग इंजिनमधील वायरच्या शॉर्टसर्किटमुळे लागली असावी."




## जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून श्री सिद्धेश्वर महायात्रा 2025 च्या कामांचा आढावा

### अक्षता सोहळा कार्यक्रम स्थानिक केबल नेटवर्कद्वारे लाईव्ह दाखवण्यात येणार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):** श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक 12 ते 16 जानेवारी 2025 या कालावधीत आहे. सर्व संबंधित शासकीय विभाग तसेच देवस्थान पंच कमिटी यांना कृती आराखड्या प्रमाणे सोपवलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेऊन यात्रा कालावधीत भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा सहज व सुलभ रीतीने उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील व्हीआयपी सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा 2025




अंतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार,पोलिस उपआयुक्त दीपाली काळे, महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सोलापूर महानगरपालिकेच्या अभियंता श्रीमती अकुलवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्ती सागर ढोले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता विशाल लेंगरे, महानगरपालिकेचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी श्री सिद्धेश्वर महा यात्रा 2025 च्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील नियमावलीप्रमाणे सर्व संबंधित विभागाच्या जबाबदारी प्रमाणे कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे त्यानुसार सर्व संबंधित विभागानी त्यांची जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. यात्रा कालावधीत येणाऱ्या हजारो भाविकांना कोणत्याही प्रकारच्या अडथळ्याशिवाय सहज दर्शन व्हावे तसेच मनोरंजन नगरीमध्ये त्यांना सहभाग (पान 2 वर..)

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात रेशीम कोष उत्पादन तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न







**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे दिनांक ०४ जानेवारी रोजी चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यामार्फत शेतकऱ्यांसाठी रेशीम कोष उत्पादन तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे हे लाभले. उपस्थित शेतकरी तथा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नान्नज येथील रेशीम कोष निर्मितीमधील युवा उद्योजक विभुते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सदरील कार्यशाळेची सुरुवात उपस्थित मान्यवर तथा शेतकरी बांधव तसेच महिला शेतकरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर उपस्थितांना लोकमंगल शैक्षणिक संकुल, संलग्नित महाविद्यालये आणि त्यातील विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रम तसेच रेशीम कोष उत्पादन तंत्रज्ञान कार्यशाळा याबाबतची ओळख प्रास्ताविकाच्या माध्यमातून कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नवनाथ गोसावी यांनी करून दिली. प्रास्ताविकानंतर कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे विभुते यांचा परिचय लोकमंगल कृषी महाविद्यालयातील कीटक शास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापिका खोबरे मॅडम यांनी सर्वांना करून दिला. स्वतचं व्यवसाय सुरू असताना देखील नवीन काही तरी करून कमी जागेतून जास्त उत्पादन मिळवण्याची आणि गेली २ वर्षे ह्या क्षेत्रात उलेखनिय कामगिरी करणाऱ्या अशा युवा शेतकऱ्याचा सन्मान कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या हस्ते शाल, भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. या समवेत त्यांच्या यशस्वी प्रवासातील त्यांचे सोबती गणराज मुळे यांचा देखील सन्मान याप्रसंगी भेटवस्तू व शाल देऊन करण्यात आला. सदरील कार्यशाळेत सर्वप्रथम चित्रफितीच्या माध्यमातून अंतिम वर्षातील विद्यार्थी प्रतिनिधी कु. दिव्या कोरेकर हिने तुती लागवड तसेच केशव जगदाळे ह्याने रेशीम कीटक संगोपन आणि मीनल कस्तुरे हिने रेशीम शेती करताना मिळणारे सरकारी अनुदान यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालयात मॉड्युल अंतर्गत यशस्वीरित्या सुरू असलेल्या रेशीम कोष उत्पादन याची शास्त्रोक्त माहिती दिली. यामध्ये रेशीम शेती मधील कमी जागा कमी वेळ यातून मिळणारे अधिक उत्पन्न तसेच रेशीम शेती ची वाढती मागणी भविष्यातील त्याची मागणी तसेच एक घरगुती शेतीला जोड धंदा हा कसा ठरू शकतो यावर त्यांनी प्रकाश टाकला. लोकमंगल कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्या मार्फत सुरू असणाऱ्या या रेशीम कोश उत्पादन प्रकल्पाविषयी त्यांनी सविस्तर अशी माहिती विशद केली. यानंतर कार्यशाळेला लाभलेले प्रमुख पाहुणे श्री. विभुते यांनी रेशीम शेती प्रकल्प उभारणीमध्ये त्यांचा अनुभव, आजवरचा जीवन प्रवास आणि रेशीम शेतीमधील व्यावसायिक भविष्य याबाबत भाष्य केले. चीन पाठोपाठ भारताने केलेली प्रगती याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले यावेळी रेशीम शेतीविषयी असलेल्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना देखील त्यांनी उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे समाधान केले. यानंतर शेतकरी मनोगतामध्ये काटी येथील रेशीम शेती नुकतीच सुरू केलेले शेतकरी प्रदीप साळुंखे आणि उले येथील प्रगतशील महिला शेतकरी सौ.दुर्गा खरतमल यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालय मार्फत आयोजित या रेशीम शेती प्रशिक्षण कार्यक्रमाचे कौतुक केले. भविष्यातील शेतकऱ्यांना असलेल्या संधी, महिलांना असणारे फायदे आणि कमी पाण्यावर चालणारी शेती अत्यावश्यक असल्याची या कार्यशाळेमुळे जाणीव झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगतामध्ये आपले विचार मांडताना लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांनी सर्वप्रथम शेळगाव, सांगवी, काटी, ऊळे आणि तामलवाडी येथून कार्यशाळेकरीता आवररजून सदरील कार्यशाळेत एकूण ६७ शेतकऱ्यांची उपस्थिती होती. यात मुख्यत्वे प्रगतशील महिला शेतकऱ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. कार्यशाळेचा शेवट कु.वैष्णवी घोडके हिने उपस्थितांचे आभार मानून केला. यानंतर युनिट ला सर्वांनी भेट दिली व त्यांचे प्रश्न विचारताना विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले तसेच हा प्रकल्प फायदेशीर आहे असे मत व्यक्त केले त्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

# सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार जाहीर









सन २०२३ साली विशेष साहित्य पुरस्कार अच्युत गोडबोले मुंबई, यांना तर ललित साहित्यकृती पुरस्कार डॉ. यशवंत पाटणे, सातारा व कविता साहित्यकृती पुरस्कार डॉ. राजेंद्र दास, कुडूर्वाडी यांना देऊन सम्मानित करण्यात आले होते. २०२४ साली विशेष साहित्य पुरस्कार इंद्रजित भालेराव व साहित्यिक पुरस्कार डॉ. सुवर्णलता निंबाळकर यांना देण्यात आले होते.

यावर्षी सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार वितरण सोहळा बुधवार दि.१५/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना प्रशासकीय कार्यालयातील उदय सभागृह येथे होणार आहे.

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आपल्या सिध्दहस्त लेखणीने सामाजिक, वैचारीक, सांस्कृतिक, कथा, कविता, ललित, ऐतिहासीक चरित्र, आत्मचरित्र इ. साहित्य प्रकारामध्ये अमुलाग्र योगदान देऊन, समाज प्रबोधन करणाऱ्या साहित्यीकाचा सन्मान करणे करीता श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांचे वतीने सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार वितरण सोहळा सन 20

23 पासून सुरू केला असून यावर्षी पुरस्कार जाहीर करणे करीता विजयसिंह मोहिते-पाटील माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य याचे अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद संपन्न झाली.

यावर्षी सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील विशेष साहित्यिक पुरस्कार लेखक, कांदबरीकार विश्वास पाटील यांना जाहीर करण्यात आला असून, त्यांनी पानिपत, झाडाझडती पांगेरा, नागकेशर, चंद्रमुखी, संभाजी, महानायक आशा कथा कादंबरी त्यांनी लिहलेल्या आहेत.

तसेच साहीत्यीक पुरस्कार 1 कथाकथनकार, कादंबरी लेखक, गदयलेखक, कवी आप्पासाहेब खोत यांना जाहिर करणेत आला असून, त्यांनी गावणेर, महापूर, रानगंगा, कळवंड, माती आणि कागुद, मरणादारी वापस आणवानी पाय, कुणब्याची पोर, इ. कथा, कादंबरीचे लेखन केले आहे.

तसेच साहित्यीक पुरस्कार 2 हा सोलापूर जिल्ह्यातील इतिहासाचे अमुलाग्र लेखन करून, अभ्यासकांना मोलाचे मार्गदर्शन करुन, ग्रंथसंपदा निर्माण करून, इतिहास लेखनात महत्वाची भर टाकणारे गोपाळराव देशमुख यांना पुरस्कार जाहीर करण्यात येत असून गहिवर, सोलापूर जिल्ह्याची बखर, असे झुंजले वीर मराठे, मराठी दौलतीचे नारीशिल्प, दोन राजधान्या, सुभेदार मल्हारराव होळकर इल्यादी ऐतिहासीक लेखन केले आहे.

तसेच यावर्षी नव्याने माळशिरस तालुक्यातील साहित्यीक पुरस्कार परिसस्पर्श या चरित्र ग्रंथाचे लेखक, कथा, पटकथा, एकांकिका, लघुनाटीका, दिग्दर्शक, मालिका, चित्रपट गीत असे अष्टपैलू लेखक प्रमोद जोशी यांना जाहीर करण्यात आला आहे. त्यांनी परिसस्पर्श, सालदारचे पोर, अनेक एकांकिका, चित्रपट, नाटक, पटकथा, मालिका लेखन टेलिफिल्म दिग्दर्शन इ. लेखन केले आहे.

माळशिरस तालुका व जिल्ह्यातील साहित्यीक चळवळीला चालना देवून नवननीव साहित्य प्रकाशात यावे यासाठी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्यिक पुरस्कार गेली तीन वर्षापासून सुरु असल्याची माहीती यावेळी देण्यात आली.

श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट, शंकरनगर-अकलूज यांचे वतीने, सहकार महर्षि शंकरराव मोहिते- पाटील साहित्य पुरस्कार २०२५ वितरण सोहळा विजयसिंह मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते व जयसिंह मोहिते-पाटील, चेअरमन, स.म.शंकरराव मोहिते-पाटील स.सा.का.लि., शंकरनगर-अकलूज, मदनसिंह मोहिते-पाटील, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशिल मोहिते-पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. तरी सर्व साहित्य प्रेमी, वाचक, लेखक, कवी यांनी सदर पुरस्कार वितरण समारंभास उपस्थित राहावे असे

# जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज सहकुटुंब श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर व शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सदर कामांची पाहणी करुन, पुरातत्त्व विभाग व संबधित कंत्राटदारानी सदर कामास गती देऊन वेळेत व गुणवत्तापूर्ण करवीत अशा सूचना यावेळी दिल्या तसेच सुरु असलेल्या कामांना उपलब्ध निधीची माहिती घेवून, उपलब्ध निधीची कमतरता भासल्यास तात्काळ निधीची उपलब्धता शासनस्तरावरुन तात्काळ येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सोलापूर शहरचे पोलीस आयुक्त एम राज कुमार, उपविभागीय अधिकारी सचिन इतापे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता खांडेकर, प्र.तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी अभियंता सोमशेखर हरसुरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सुरू असलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती यावेळी दिली.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग सदस्य डॉ. पी. पी. वावा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सफाई कर्मचाऱ्यांचे सर्वात महत्त्वाचे प्रश्न हे आरोग्य व निवासस्थानाचे असतात. त्यामुळे जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागातील सर्व सफाई कर्मचारी यांची नियमित आरोग्य तपासणी तसेच त्यांच्या निवासस्थानाची दुरुस्ती कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, असे निर्देश राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी.पी. वावा यांनी दिले.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य वावा यांनी आज सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी या बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, श्री वीरेंद्र नाथ सामाजिक सल्लागार, श्री संदीप चव्हाण,व अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, सहायक आयुक्त जिल्हा नगर प्रशासन अधिकारी विना पवार, सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे, महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त आशिष लोकरे, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) कादर शेख, समाज कल्याण अधिकारी सचिन कवले, पोलीस विभागाचे राजन माने, तसेच जिल्ह्यातील सर्व नगर परिषदांचे मुख्याधिकारी तसेच सफाई कामगार तक्रार निवारण समितीचे सदस्य खज्जप्पा दादनवस, वाळुंजकर, सायमन गड्ड, श्रीनिवास रामगल, बाली मंडेपु आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. वावा यांनी केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळेल यासाठी संबंधित प्रमुखांनी दक्षता घ्यावी. एक ही सफाई कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाहीत यासाठी प्रयत्न करावेत. सफाई कर्मचाऱ्यांसाठी वेळोवेळी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. तसेच मेडिक्लेम योजनेचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना मिळावा यासाठी जिल्ह्यातील बँकामार्फत प्रयत्न करावेत असेही त्यांनी सुचित केले.

सफाई कामगारांना देण्यात येणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या घरांच्या योजनेबाबत आढावा घेण्यात आला. तसेच सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांबाबत, सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य शिबिराचे आयोजन तसेच त्यांना हॅपिटायटीस बी इंजेक्शन याबाबत माहिती देण्यात आली तसेच सी एस आर फंडामधून बँकांनी सफाई कर्मचाऱ्यांना आरोग्याच्या उपचारासाठी पैसे देण्याबाबत मुख्याधिकाऱ्यांनी बँकाना पत्र देण्यात यावे. तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या पगारांमधून काही पैसे कापून त्यांना मेडिक्लेमसाठी कार्ड देण्यात यावेत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या महिलाना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत त्यांना चेंजिंग रूम, हिरकणी कक्ष, स्वतंत्र शौचालय तसेच महिला तक्रार निवारण समिती याबाबतच्या मागण्यांचा विचार करून ज्या ठिकाणी या सुविधा मिळत नाहीत त्या देण्याबाबत मुख्याधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या.

तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या किमान वेतन व सेवा पुस्तके अद्यावत करण्याबाबत आढावा घेण्यात आला सफाई कर्मचाऱ्यांना रमाई आवास योजना तसेच पंतप्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत घरांचे अनुदान वाटप मंजूर करण्याबाबत आढावा घेण्यात आला. सफाई कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर आर्थिक लाभाबाबत आढावा घेतला.

जिल्हाधिकारी होणार आशीर्वाद केंद्र जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व सफाई कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती बैठकीत दिली. तसेच प्रशासन सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत संवेदनशील असून सर्व शासकीय योजनांचा लाभ तात्काळ मिळण्यासाठी महापालिका व नगरपालिकेच्या माध्यमातून प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपाबाबत नियुक्ती त्यांची माहिती उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली. जिल्हा नगर प्रशासन सहाय्यक आयुक्त विना पवार यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील नगरपरिषदा तसेच महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत आढावा घेण्यात आला.

# जिल्ह्यात स्वच्छ माझे अंगण, वैयक्तिक शोषखड्डे बांधकाम अभियान




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत स्वच्छ माझे अंगण अभियान दि. 1 जानेवारी ते दिनांक 20 जानेवारी या कालावधीत राबविणेत येणार आहे. मनरेगा अंतर्गत वैयक्तिक शोषखड्डे बांधकाम अभियान दि.1 जानेवारी ते 10 जानेवारी 2025 दरम्यान जिल्ह्यात राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांनी दिली.

सांडपाणी व्यवस्थापना साठी वैयक्तीक स्तरावर शौषखड्डे घेणेत येत आहेत. ज्या कुटुंबा कडे शौषखड्डा असणार आहे त्या कुटूंबाचा गौरव करणेत येणार आहे. स्वच्छ माझे अंगण या अभियानात स्वच्छतेचे आदर्श उदाहरण ठरलेल्या कुटुंबांना दि. 26 जानेवारी रोजी ग्रामसभेत सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. ग्रामीण भागात स्वच्छतेचा आदर्श निर्माण करून इतरांना प्रेरित करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन सिईओ जंगम यांनी केले आहे. या पुर्वी अभियानात शौषखड्डे घेतलेले कुटुंबाची नोंद देखील या अभियानात घेणेत येणार आहे. प्रत्येक गावात या अभियानाची दवंडी देऊन सुचना फलकावर देखील सुचना देऊन जागृती करणेते सुचना गटविकास अधिकारी यांचे बैठकीत दिले आहेत.

घरातील कचरा व्यवस्थापन सांडपाणी व्यवस्थापन व शौचालयांच्या स्वच्छतेबाबत नियमांचे पालन करावे. यासाठी गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी (पंचायत), ग्रामपंचायत अधिकारी यांनी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी बजावणी करावी महिला बचत गट व ग्रामस्थांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असे आव्हान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांनी केले आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग शिबिराचा सहकार्य घ्या- सिईओ जंगम**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग शिबिर ज्या गावात घेणेत येतील त्या ठिकाणी शौषखड्डे घेणेचे नियोजन करणेत यावे. या मध्ये उत्कृष्ठ काम करणारे महाविद्यालयाचा देखील सन्मानपत्र देऊन गौरव करणेत येणार आहे. ग्रामपंचायतींनी महाविद्यालयाचे सहकार्य घ्यावे असे आवाहन सिईओ जंगम यांनी केले आहे.

**स्वच्छ माझे अंगण अभियान कालावधी टप्पे**

- अभियान कालावधी : दि. 1 जानेवारी ते 20 जानेवारी 2025
- पडताळणी कालावधी : दि. 21 जानेवारी ते 24 जानेवारी 2025
- पात्र कुटुंबांना निमंत्रण : दि. 25 जानेवारी
- प्रशस्तीपत्र व सन्मान : दि. 26 जानेवारी

**स्वच्छ माझे अंगण अभियानाचे उद्दिष्टे**

प्रत्येक कुटुंबाने स्वच्छतेचे उच्चतम मानक राखत ग्रामीण भाग स्वच्छ व सुंदर बनवणे, वैयक्तिक शौचालयाचा नियमित वापर आणि दैनंदिन स्वच्छतेचे पालन, घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण व पुनर्वापर, कंपोस्ट खत तयार करणे, परसबाग व सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डा व बाजार खड्ड्यांचा वापर करणे हे अभियानाचे उद्दिष्ट आहेत.

**गाव स्तरावर वैयक्तिक शोषखड्डे बांधकाम अभियान**

ग्रामीण भागात गाव स्तरावर नरेगा अंतर्गत कुटुंब स्तरावर वैयक्तिक शोषखड्याचे बांधकाम होणेच्या दृष्टीने दि.. 1 जानेवारी ते 10 जानेवारी दरम्यान हे अभियान राबविले जाणार आहे. या अभियानात गाव स्तरावर अभियानाची माहिती पुण्याच्या दृष्टीने दवंडी देणे, लाभार्थ्यांना वैयक्तिक शोषखड्डा बांधकामासाठी प्रवृत्त करणे, वैयक्तिक रोज खड्ड्यांचे बांधकाम करून त्याची शासनाच्या संकेतस्थळावर नोंद करणे या बाबी राबविल्या जाणार आहेत. नरेगा अंतर्गत वैयक्तिक शोषखड्डे बांधकामासाठी राज्यस्तरावरून जिल्ह्यासाठी 1,50,000 चे उद्दिष्ट देण्यात आले आहे. सदरचे उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण करण्याचे दृष्टीने अभियानाचे सूक्ष्म नियोजन करून अभियान यशस्वी राबविणे बाबतच्या सूचना पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे व प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी दिले आहेत.

**ग्रामपंचायतींना शौषखड्याचे उदिष्टय - शेळकंदे**

मनरेगा अंतर्गत कुटूंबा कडे शौषखड्डे घेणेत येणार आहेत. १० जानेवारी पर्यंत हे अभियान राहणार असून ग्रामसेवक यांनी कुटूंबाची नोंद घेऊन त्यांना या अभियानात सहभागी करून घ्यावे. ज्या ग्रामपंचायती या अभियानात उत्कृष्ठ काम करतील त्यांनी नोंद जिल्हा स्तरावर घेऊन ग्रामपंचायतींचा गौरव करणेत येणार असल्याचे ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवक यांचे बैठकीत केले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प येथे ग्रामसेवक यांची बैठक आयोजित करणेत आली होती.

# नातेपुते येथील महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात ३ जानेवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती प्राचार्य डॉ.रज्जाक शेख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी सानिका माने (१२ सायन्स) व ऋतुजा लोंढे (१२ आर्ट्स) यांनी मनोगत व्यक्त करताना केवळ सावित्रीबाई फुले यांच्यामुळे आज आम्ही मुली व महिला शिक्षण घेऊन सक्षम होत असल्याचे मनोगत व्यक्त केले. त्याबरोबरच प्राध्यापक राजेंद्र साठे यांनी विद्येची देवता सावित्रीबाई फुले आहेत त्यांनी स्त्री शिक्षणासाठी चळवळ उभी केली असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक प्रा. पुष्पा सस्ते यांनी सन १८ व्या शतकात सावित्रीबाईंना ज्या यातना सहन कराव्या लागल्या तो त्रास सध्याच्या मुली व महिलांना नाही पण वैचारिक क्रांती करून मुलींनी स्वतः सक्षम व निर्भीड बनणे आवश्यक आहे असे मत प्रा. पुष्पा सस्ते व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रज्जाक शेख यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना सावित्रीबाई फुलेंनी मुलींसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली या शिक्षणाचा उपयोग आपल्या करिअरसाठी करावा गैरवर्तन टाळून चारित्र्यसंपन्न बनावे. आपल्या आई-वडिलांचे महाविद्यालयाचे व संस्थेचे नावलौकिक करावे असा शुभ संदेश दिला. या कार्यक्रमासाठी प्रा मोगल हसन प्रा.नारायण माने, प्रा. अजित भोपळे, प्रा.दयानंद साठे, प्रा. सतीश चव्हाण, प्रा.सचिन माळी, प्रा.शिवाजी बर्गे, प्रा. बापूराव वाघमोडे, प्रा. नितीन देशपांडे प्रा.दीपक वाघमोडे यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे विद्यार्थिनी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रब्बाना शेख व मोगल यांनी केले. प्रा. सचिन पवार यांनी आभार मानले.

# नूतन विद्यालय कोर्टी येथे बाजार डे उत्साहात संपन्न



**कोर्टी (कटूसत्य वृत्त):-** कोर्टी येथे नूतन विद्यालय येथे शालेय विद्यार्थी विद्यार्थ्यांना, विविध कला क्षेत्रामध्ये वाव मिळावा म्हणून ही शाळा विविध उपक्रम राबवत आहे, त्यातच शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना या शाळेमध्ये बाजार डे भरून शालेय विद्यार्थ्यांना स्वावलंब व आपला काम करून पैसे कसे कमावता यावे व व्यवहार ज्ञान कसे असावे याचे ज्ञान या बाजार डे मधून व्हावे म्हणून हा बाजारा डे भरवण्यात आला आहे असे या शाळेचे मुख्याध्यापक प्रसाद संत सर यांनी सांगितले

या बाजार डे मध्ये विद्यार्थी विद्यार्थ्यांनी, पालक भाज्या, मेथी कोथिंबीर टमाटे बटाटे, तर काही विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी भेळ पाणीपुरी आलू पराठा चॉकलेट बिस्कीट कुरकुरे उडीद वडा गुलाब जामुन खारी बटाटे वडा भजी शेंग चटणी दही धपाटे आप्पे खोबरे चटणी इत्यादी पदार्थ विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी बाजार डे निमित्त विक्री करता ठेवण्यात आले होते या बाजार डे विद्यार्थी विद्यार्थिनी शाळेतील मुख्याध्यापक मुख्याध्यापिका सर्व शिक्षक शिक्षिका शिपाई व सर्व स्टॉप जणांनी या बाजार डे चा मनसोक्तपणे आनंद घेतला

हा आनंदी बाजार डे उत्साहात साजरा करण्यासाठी नूतन विद्यालय येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक शिक्षिका व शिपाई स्टॉप यांनी अधिक परिश्रम घेतली